# ''उचला रे उचला'' ऑडिओ सिडी प्रकाशित

क्षितीज मुव्हीज इंटरनॅशनल प्रस्तुत बॅनरखाली यशवंत चौघुले निर्मित आणि यशवंत चौघुले व अमोल भावे दिग्दर्शित **'उचला रे उचला'** या चित्रपटाच्या ऑडीओ सिडीचे प्रकाशन नुकतेच सुप्रसिद्ध निर्माता- दिग्दर्शक आणि अभिनेता महेश मांजरेकर हयांच्या हस्ते संपन्न झाले. निर्माते यशवंत चौघुले यांनी महेश मांजरेकर यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. या प्रसंगी संगीतकार चिनार महेश, गीतकार बाबा चव्हाण, सहनिर्माता भवर जैन, लेखक गजेंद्र कोरे, गायिका वैशाली माडे, डॉ. नेहा राजपाल, तसेच चित्रपटातील कलाकार वैभव मांगले, आनंद इंगळे, तृप्ती भोईर, दिपाली विचारे, जयवंत वाडकर, प्रदीप पटवर्धन, किशोर प्रधान, प्राजक्ता केळकर, हयांच्या सह अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होती. अभिनेते सचिन खेडेकर यांच्या उपस्थितिनेही या कार्यक्रमात आगळी रंगत आली. यावेळी नॅशनल ॲवॉर्ड विजेता बालकलाकार विवेक चाबुकस्वार याचा सत्कार करण्यात आला.

**'उचला रे उचला'** हा अर्थपुर्ण विनोदाने व व्यंगाने नटलेला कौटुंबिक, करमणूक योग्य असा हा चित्रपट आहे. मृत्युच्या हातात म्हणजेच यमाच्या हातात कसलं फर्मान आहे? आज त्याच्या यादीत कुणाची नावे आहेत, कुणास ठाऊक.पण मृत्य हा अटळ आहे. हे माहीत असूनही प्रत्येकजण हा मृत्युला घाबरत असतो. हे सर्वात मोठे आश्चर्य आहे. एखाद्याचं मरण ठरवायचं यमाचा हा अधिकार जर आपल्याला प्राप्त झाला तर निःस्वार्थीपणे निर्णय आपण देऊ? पण स्वःतच्या मरणाच्या बाबतीत मात्र आपण तसे वागणार नाही. मनुष्य किती स्वार्थी असतो, छोट्या-छोट्या गोष्टीत स्वार्थ बघत असतो मग समोर कोणीही असू दे. अशीच कथा एका सोसायटी मध्ये रहाणाऱ्या रामकाका आणि रामभाऊ यांच्या बाबतीत घडते. त्यापैकी एकाचा मृत्यु जवळ आला आहे व त्या रामचे प्राण घेण्यासाठी करण्यासाठी प्रत्यक्ष यम पृथ्वीवर आला आहे पण एकाच नावाच्या दोन व्यक्तिमुळे तोही गोंधळतो यातला नेमका राम कोण? आणि हा असा धमाल गोंधळ पडद्यावर पहाण्यात मजा येईल. **उचला रे उचला'** हा चित्रपट एका वेगळ्या फॅटसी विषयावरील विनोदी कथानकावर आधारित असून सध्याच्या एकूणच मानसिकतेवर प्रकाश टाकणारा असून प्रसंगनिष्ठ विनोदावर या चित्रपटाचे कथानच हयात गुंफण्यात आले आहे.

एका वेगळ्या कथानकातून मनोरंजना बरोबरच समाज प्रबोधन करण्याचा प्रयत्न या चित्रपटातून करण्यात आला आहे. विनोदा बरोबरच आजच्या पिढीची अभिरूची लक्षात घेऊन या चित्रपटाला दिलेले संगीत हेही या चित्रपट यात एकूण तीन विविध गीतांचा समावेश असून ती डॉ. नेहा राजपाल, ऋषीकेश कामरेकर, सावनी रवींद्र, चिनार, राहुल रानडे, व वैशाली माडे यांनी गायिली आहे. याची कथा गजेंद्र कोरे यांची असून पटकथा संवाद गजेंद्र कोरे आणि यशवंत चौधुले यांचे आहेत. याची छाया हरीश सावंत, संकलन सचिन नाटेकर, कला वासु पाटील यांचे असून महेश चाबुकस्वार हे या चित्रपटाचे निर्मिती प्रमूख आहेत.

***Nishith Mahal Co.op Hsg Soc, Flat No 2, Gr Floor, Shastri Nagar, Near Vartak College, Vasai (W), Thane- 401202,***
***Mob: 9321718814/ 8605596999, Email Id: banesanjaym@gmail.com, sanjay_bane008@yahoo.com***